## दक्षिण आफ्रिकेतील अपघातात ४५ ठार

**केपटाऊन :** दक्षिण आफ्रिकेत गुरुवारी भाविकांना ईस्टर सणासाठी घेऊन जाणारी बस एका पुलावरून कोसळल्यानंतर तिला आग लागल्याने किमान ४५ प्रवासी मरण पावले. अपघातातून केवळ आठ वर्षांचा एक मुलगा बचावला असून, गंभीर जखमी झालेल्या या मुलावर उपचार सुरू आहेत.

## बंगळूरु स्फोटप्रकरणी इनाम जाहीर

**नवी दिल्ली :** बंगळूरुतील रामेश्वरम उपाहारगृहात झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपींची माहिती देणाऱ्यास राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) शुक्रवारी दहा लाख रुपयांचे इनाम जाहीर केले. या बॉम्बस्फोट प्रकरणातील मुस्सवीर हुसैन शाझिब ऊर्फ शाझेब आणि अब्दुल मथीन अहमद ताहा ऊर्फ अब्दुल मथीन तहा यांच्याबद्दल नागरिकांनी माहिती द्यावी, असे आवाहन 'एनआयए'ने 'एक्स' संदेशाद्वारे केले आहे.

## आसामच्या ४ जिल्ह्यांत 'अफस्पा'ला मुदतवाढ

**गुवाहाटी :** आसाम सरकारने सशस्त्र दले (विशेषाधिकार) कायदा (अफस्पा) राज्याच्या चार जिल्ह्यांमध्ये १ एप्रिलपासून सहा महिन्यांसाठी लागू केला आहे. अफस्पा अंतर्गत 'अशांत क्षेत्रा'ची व्याप्ती तिनसुकिया, दिब्रुगड, चराईदेव आणि शिवसागर जिल्ह्यांकरिताही वाढवण्यात आली आहे.

# अन्सारीच्या मृत्यूची न्यायालयीन चौकशी

## उपचारादरम्यान मृत्यू; तुरुंगात विषप्रयोग केल्याचा कुटुंबीयांचा आरोप

**पीटीआय, गाझीपूर**

**उत्तर प्रदेशातील** कुख्यात गँगस्टर मुख्तार अन्सारी याचा गुरुवारी रात्री उशिरा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. उत्तर प्रदेशातील बांदा तुरुंगात तो शिक्षा भोगत होता. ६३ वर्षीय अन्सारी याला गुरुवारी जिल्हा तुरुंगातून बेशुद्धावस्थेत रानी दुर्गावती वैद्यकीय महाविद्यालयात आणण्यात आले. तेथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. मात्र अन्सारीची पद्धतशीर कट रचून हत्या केल्याचा आरोप त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे.



अन्सारी याच्या मूळ गावी मोहम्मदाबाद येथे ग्रामस्थांनी गर्दी केली होती.

या आरोपांनंतर बांदा येथील मुख्य न्यायदंडाधिकारी भगवान दास यांनी मुख्तार अन्सारी याच्या मृत्यूच्या न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले. अन्सारीच्या मृत्यूनंतर त्याच्या निवासस्थानी लोक मोठ्या संख्येने जमा होत आहेत. गाझीपूर जिल्ह्यामधील अन्सारीचे मूळ गाव मोहम्मदाबाद युसुफपूर येथील दुकाने बंद करण्यात आली आहेत. अन्सारीचा मृतदेह त्याच्या मूळ गावी आणण्यात येईल. त्यामुळे तेथे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मोठ्या प्रमाणावर सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली आहे. बांदा, आणि गाजीपूरसह मऊ, बलिया आदी भागात मोठ्या प्रमाणात सुरक्षा वाढवण्यात आली असून कलम १४४ लागू करण्यात आले आहे.

अन्सारीच्या कुटुंबीयांनी काली बाग येथे त्याच्या दफनविधीची व्यवस्था केली आहे. अन्सारीचे शव शुक्रवारी १० वाजेपर्यंत ताब्यात मिळाल्यास शुक्रवारीच दफनविधी करण्यात येईल, असे कुटुंबीयांनी सांगितल्याची माहिती मोहम्मदाबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पवन कुमार उपाध्याय आणि सर्कल ऑफिसर अतार सिंह यांनी दिली. अन्सारीचे शवविच्छेदन बांदा येथे करण्यात आले. अन्सारीचा मुलगा उमर अन्सारीने वडिलांचे शवविच्छेदन दिल्ली एम्समध्ये करण्याची मागणी केली होती.

### मुख्तार अन्सारी कोण होता?



मुख्तार अन्सारी याने वयाच्या १५ व्या वर्षी गुन्हेगारीत पाऊल टाकले. १९६३ मध्ये एका प्रभावशाली कुटुंबात जन्मलेल्या अन्सारीने राज्यात तेव्हा भरभराट झालेल्या सरकारी कंत्राट माफियांमध्ये स्वतःची टोळी स्थापन केली. १९८६ पर्यंत तो कॉन्ट्रॅक्ट माफिया वर्तुळात एक प्रसिद्ध चेहरा बनला होता. त्याच्यावर एकूण ६५ गुन्हे दाखल होते. अन्सारी पाच वेळा आमदार राहिला होता.

# माजी राज्यमंत्री, शेकापनेत्या मीनाक्षी पाटील यांचे निधन

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**अलिबाग :** माजी राज्यमंत्री आणि शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या मीनाक्षी पाटील यांचे वयाच्या ७६ व्या



वर्षी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. शेकापच्या झुंझार नेत्या अशी त्यांची ओळख होती. रायगड जिल्ह्यातील प्रकल्पविरोधी अनेक लढ्याचे त्यांनी नेतृत्व केले होते. त्यांच्या पार्थिवावर पेझारी येथे शुक्रवारी दुपारी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

मीनाक्षी पाटील यांचा जन्म कर्जत तालुक्यातील भडवळ येथे १३ सप्टेंबर १९४८ रोजी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण पोयनाड येथे तर उच्च शिक्षण जेएसएम महाविद्यालय अलिबाग येथे झाले होते. त्यांचे वडील प्रभाकर पाटील यांच्याकडून राजकारणाचा वारसा लाभला होता. शालेय जीवनापासूनच त्यांनी राजकारणाचे धडे गिरविण्यास सुरुवात केली होती. वाचनाची प्रचंड आवड असल्याने त्यांचे वक्तृत्व समृध्द झाले होते. राजकारणात येण्या आधी पत्रकारितेतही त्यांनी काही काळ काम केले. कृषीवलच्या संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले. बिहार प्रेस बिल विरोधात देशभरात जी पत्रकारांची आंदोलने झाली होती, त्यात मीनाक्षी पाटील या अटक होणाऱ्या पहिल्या महिला पत्रकार होत्या.

पोयनाड आणि आंबेपूर या ग्रामपंचायतींच्या पहिल्या महिला सरपंच म्हणून काम पाहिले. नंतर वैजाळी जिल्हा परिषद मतदारसंघातून त्या जिल्हा परिषदेवर निवडून गेल्या. शेकापच्या महिला आघाडी प्रमुख पदाची जबाबदारी त्यांनी १९८०- १९९५ या काळात संभाळली होती. यानंतर अलिबाग मतदारसंघातून १९९५, १९९९, २००९ अशा तीन वेळा विधानसभेवर निवडून गेल्या होत्या. १९९९ मध्ये स्थापन झालेल्या विलासराव देशमुख यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी बंदरे, खारलँड आणि मत्स्यव्यवसाय विभागाचे राज्यमंत्रीपद संभाळले होते.

शेकाप सरचिटणीस जयंत पाटील आणि माजी आमदार सुभाष पाटील यांच्या त्या ज्येष्ठ भगिनी होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा आस्वाद पाटील, सून आणि नातवंडे असा परिवार आहे.

> मीनाक्षीताई यांच्या निधनाने राजकीय क्षेत्रातील अभ्यासू, कार्यकुशल आणि लोकाभिमुख नेतृत्व हरपले. शेकापच्या झुंझार नेत्या म्हणून त्या ओळखल्या जायच्या. - **शरद पवार**, खासदार

> माझ्यावर त्यांनी ज्येष्ठ भगिनीच्या नात्याने प्रेम केले. माझी उमेदवारी जाहीर झाली तेव्हा आशीर्वाद देण्यासाठी त्यांनी फोन केला होता. - **सुनील तटकरे**, खासदार

> आमच्या कुटुंबातील मायेची सावली हरपली... - **जयंत पाटील**, शेकाप सरचिटणीस

## काश्मीरमध्ये वाहन दरीत कोसळून १० ठार

**पीटीआय, बनिहाल, जम्मू**

**जम्मू- काश्मीरच्या** रामबन जिल्ह्यात शुक्रवारी एक एसयूव्ही जम्मू- श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरून घसरून दरीत कोसळून दहा जण ठार झाले.

श्रीनगरहून जम्मूला जाणारे हे तवेरा वाहन मध्यरात्री सव्वा वाजताच्या सुमारास बॅटरी चष्मा भागात तीनशे फूट खोल दरीत कोसळले. नऊ प्रवासी आणि एसयूव्हीचा वाहनचालक यांचे मृतदेह सापडले. या भागात मुसळधार पाऊस कोसळत असताना पोलीस आणि राज्य आपदा प्रतिसाद दलाच्या (एसडीआरएफ) जवानांनी मृतदेह बाहेर काढले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये या अपघाताबाबत दुःख व्यक्त केले.

## तलाठी भरतीच्या सुधारित गुणवत्ता यादीत अनेक अपात्र

*(पान १ वरून)* आली. परीक्षा झाल्यानंतर टीसीएस कंपनीने २८ सप्टेंबर २०२३ ते ८ ऑक्टोबर या कालावधीत प्रश्न-उत्तरांबाबत प्राप्त आक्षेपांचे पुन्हा पुनर्विलोकन केले. त्यानंतर स्पर्धा परीक्षा समितीसह अनेक उमेदवारांनी भरतीमधील चुकांवर आक्षेप घेतला. काही परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार झाल्याचा आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करूनच निकाल जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली होती. यासाठी काही संशयित उमेदवारांची नावेही देण्यात आली होती. मात्र, याकडे दुर्लक्ष करीत भूमी अभिलेख विभागाने जानेवारीत गुणवत्ता यादी जाहीर केली. परंतु, काही उमेदवारांनी परीक्षेतील प्रश्नांबाबत आक्षेप नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात धाव घेतली. त्यावर याचिकाकर्त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्याचा आदेश न्यायालयाने दिला.

> महसूल विभागाने संपूर्ण तपासणी न करता निकाल जाहीर केल्याने हा गोंधळ उडाला. आम्ही नावे दिलेल्या संशयितांचा निकाल थांबवला आहे. आतातरी या संपूर्ण प्रकरणाचा तपास करूनच नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण व्हावी, अशी अपेक्षा आहे. - **राहुल कवठेकर**, स्पर्धा परीक्षा समन्वय समिती.

# काँग्रेसभोवती कर'फास'!

> न्यायालयात आम्हाला दिलासा मिळेल, पण तोपर्यंत लोकसभेची निवडणूक झालेली असेल. ही आर्थिक गळचेपी नाही तर काय? - **अजय माकन**, काँग्रेस खजिनदार

*(पान १ वरून)* प्रकरणातील दंडात्मक कारवाईच्या पुनर्विचाराची काँग्रेसची याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळल्यानंतर २४ तासांतच प्राप्तिकर विभागाने नवीन नोटीस बजावली. २०१७-१८ आणि २०२०-२१ मधील करांची प्रकरणे प्राप्तिकर विभागाने ऐरणीवर आणली असून काँग्रेसला दंड आणि व्याज असे एकूण १ हजार ८२३ कोटी भरण्याची सूचना केली आहे. याआधीच काँग्रेसच्या ४ बँकांमधील ११ खाती गोठवण्यात आली असून १३५ कोटींचा दंड लागू करण्यात आला होता. त्यामुळे काँग्रेसचे सुमारे २८० कोटी रुपये बँक खात्यांत पडून असून त्याचा वापर करता येत नसल्याचा पुनरुच्चार काँग्रेसचे खजिनदार व महासचिव अजय माकन यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला.

**सोमवारी न्यायालयात आव्हान**

काँग्रेसने पहिल्या दंडात्मक कारवाईविरोधात तीन वेळा सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता, पण न्यायालयाने प्राप्तिकर लवादाकडे दाद मागण्यास सांगितले होते. आता नवी दंडात्मक कारवाई केली गेली असून लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसला लोकांकडून जमा केलेल्या पैशांचा वापर करता आला नाही तर काँग्रेसची प्रचंड कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सोमवारी या कारवाईविरोधात सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले जाईल, अशी माहिती माकन यांनी दिली. गेल्या आठवड्यामध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने २०१४-१५ ते २०१६-१७ या तीन वर्षांतील करविषयक प्रकरणांसंदर्भातील याचिका फेटाळली होती. काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष सीताराम केसरी यांच्या काळातील (१९९३-९४) करविषयकप्रकरणी प्राप्तिकर विभागाने ५३ कोटींची नोटीस बजावली असल्याची माहिती माकन यांनी दिली.

**काँग्रेसविरोधात कर-दहशतवाद?**

ऐन लोकसभा निवडणुकीत काँग्रेसविरोधात भाजपचा हा कर-दहशतवाद आहे, अशी भूमिका जयराम रमेश यांनी पत्रकार परिषदेत घेतली. निवडणूक रोखे हा जगातील सर्वात मोठा भ्रष्टाचार असून भाजपला 'चंदा लो-धंदा दो' योजनेत ८ हजार २०० कोटी रुपये मिळाले आहेत. ईडी, सीबीआय या तपास यंत्रणांच्या छाप्यानंतर रोख्यांतून भाजपला लाच दिली गेली आहे, असा गंभीर आरोप रमेश यांनी केला.

**भाकपलाही नोटीस**

काँग्रेसनंतर प्राप्तिकर विभागाने भारतीय कम्युनिस्ट पक्षालाही ११ कोटी रुपयांच्या दंडाची नोटीस बजावली आहे. गेल्या काही वर्षांत पक्षाने जुन्या पॅन क्रमांकांच्या आधारे कर परतावा भरल्याबद्दल ही कारवाई करण्यात आली असल्याचे समजते. काँग्रेसवर झालेली कारवाई 'इंडिया'तील कोणत्याही पक्षाविरोधात केली जाऊ शकते, अशी भीती 'भाकप'चे महासचिव डी. राजा यांनी यापूर्वीच व्यक्त केली होती.

## मराठा समाजाच्या दोन गटांत हाणामारी

*(पान १ वरून)* समाजाच्या बैठका सुरू आहेत. कोणत्याही एका उमेदवाराला पाठिंबा दिला, तर मराठा मतांचे विभाजन होणार नाही, या भूमिकेतून या बैठका घेतल्या जात आहेत. सकल मराठा समाजाची बैठक छत्रपती संभाजीनगर येथील जळगाव रोडवरील मराठा मंदिर या ठिकाणी घेण्यात आली. समन्वयकांच्या बैठकीत काही जण शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्याकडून पैसे घेऊन घुसल्याचा आरोप करत मराठा समाजाच्या एका गटाच्या कार्यकर्त्याने दुसऱ्या गटातील कार्यकर्त्याचा शर्ट धरल्याने वादाची ठिणगी पडली. नंतर या दोन्ही गटांत हाणामारी झाली. ''आपण पूर्वीपासून मराठा क्रांती मोर्चात होतो, त्याचे पुरावेही आमच्याकडे आहेत. पण नाहक तुम्ही कोण असे विचारत मारहाण करण्यात आली,'' असा आरोप एका गटातील कार्यकर्त्यांनी केला. या वेळी दोन्ही गटांच्या महिला प्रतिनिधींमध्येही वाद झाला. परिणामी, बैठक गुंडाळण्यात आली.

नांदेड लोकसभा मतदारसंघात मराठा समाजातर्फे अपक्ष उमेदवार उभा करण्याचा प्रस्ताव बहुसंख्य कार्यकर्त्यांनी (७० टक्के) फेटाळून लावला. मनोज जरांगे पाटील यांच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील विविध मराठा संघटनांच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक शुक्रवारी दुपारी नांदेडमध्ये झाली; पण जरांगे यांच्या जिल्ह्यातील सभांदरम्यान सक्रिय राहिलेले अनेक कार्यकर्ते बैठकीकडे फिरकले नाहीत. जरांगे यांचे परभणी येथील एक सहकारी सुभाष जावळे हे बैठकीला निरीक्षक म्हणून उपस्थित होते.

**मराठा आंदोलनाचा वापर निवडणुकीसाठी नको!**

**जालना:** मराठा आंदोलनाच्या माध्यमातून लोकसभा निवडणूक लढवू नये, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांना उद्देशून करणारा प्रस्ताव शुक्रवारी सकल मराठा समाजाच्या बैठकीत संमत करण्यात आला. मराठा आरक्षणास विरोध करणाऱ्या उमेदवारांच्या विरोधात समाजाने आपला प्रभाव दाखवावा, अशी अपेक्षाही या बैठकीत व्यक्त करण्यात आली. अपक्ष उमेदवार उभे करू नयेत, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

## शब्दकोडे- २९९



**आडवी विधाने :** (१) परिचय, ज्ञान (३) दुर्दैवी, दैवहीन (७) भित्रा, कायर (८) पर्वत, चीजवस्तू, माल (९) बाधा उत्पन्न करणारे (११) दोषवर्णन, निंदा (१३) द्वेष, मत्सर (१४) एक अक्षरसुद्धा (१६) कमतरता, न्यून (१८) गोजी, पाडी (१९) ताजा, प्रफुल्लित, टवटवीत (२१) लघू (२२) भाताचे रोप, छत (२४) जिना, शिडी, पायरी (२६) तरट, गोणपाट (२७) एक प्रकारची शेंगभाजी (२९) जाडजूड साखळी (३२) कोंब, अंकुर (३३) बारीक नजर, गुप्त देखरेख (३४) खिडकी, झरोका

**उभी विधाने :** (१) वाळवी, गवंड्याचे एक साधन (२) पत्थराची जमीन (३) केवळ कल्पनेमधील (४) शिजवलेले अन्न (५) सोन्याचा पर्वत (६) वाण, वर्ण (१०) भूमी, धरित्री (१२) घशाला पडलेली शुष्कता (१५) काक (१६) हकालपट्टी (१७) वतन असलेला (१८) ऐन तिन्हीसांजेची वेळ (२०) चाल, पद्धत (२३) नीर, जळ (२५) रसदार, रसाने भरलेले (२६) माधुर्य, मधुरता (२८) जखम, दुखापत (३०) उत्तम पिकासाठी शेतात घालावयाचे कुजट मिश्रण (३१) मग्न, गुंग, लीन

**- सरोज ताठरे**

## दिनदर्शिका

**शनिवार, ३० मार्च २०२४**

भारतीय सौर १० शके १९४५

मिती फाल्गुन कृष्णपक्ष पंचमी २१ : १५ पर्यंत.

नक्षत्र : अनुराधा २२ : ०४ पर्यंत.

चंद्र : वृश्चिक

सूर्योदय : ०६ : ३५

सूर्यास्त : १८ : ५१

- **मेष** : वादविवाद टाळा.
- **वृषभ** : जोडीदाराची साथ मिळेल.
- **मिथुन** : सहनशीलता वाढवा.
- **कर्क** : नवी ओळख होईल.
- **सिंह** : सुखाची दिनचर्या.
- **कन्या** : शेजाऱ्यांविषयी आपुलकी.
- **तूळ** : गोडधोड जेवणाचा बेत.
- **वृश्चिक** : महत्त्वाचे काम होईल.
- **धनू** : तोंडावर ताबा ठेवा.
- **मकर** : अनुकूल दिवस.
- **कुंभ** : व्यावसायिक वाढ होईल.
- **मीन** : उत्साह वाढेल.

**शुभ राशी : मकर , मीन**

## सुडोकू - २९९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ६ | | | ७ | | ९ |
| | ७ | | | | | | | ८ |
| | १ | | | ४ | ७ | | | |
| | | | | | | ८ | | |
| | ९ | १ | ५ | | ४ | ३ | ६ | |
| | | २ | | | | | | |
| | | | ८ | ६ | | | ५ | |
| ७ | | | | | | | १ | |
| ३ | | ६ | | | ९ | | | |

## सुडोकू - २९८चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ८ | ४ | ७ | ६ | १ | २ | ९ | ३ |
| २ | ७ | ३ | ८ | ९ | ४ | ६ | ५ | १ |
| १ | ६ | ९ | २ | ५ | ३ | ७ | ८ | ४ |
| ६ | ५ | १ | ४ | २ | ८ | ९ | ३ | ७ |
| ८ | ४ | ७ | १ | ३ | ९ | ५ | २ | ६ |
| ९ | ३ | २ | ६ | ७ | ५ | १ | ४ | ८ |
| ४ | २ | ८ | ५ | १ | ६ | ३ | ७ | ९ |
| ३ | १ | ५ | ९ | ८ | ७ | ४ | ६ | २ |
| ७ | ९ | ६ | ३ | ४ | २ | ८ | १ | ५ |

## शब्दकोडे - २९८चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कं | ठ | शो | ष | ■ | शे | त | क | री | ■ |
| क | सा | ■ | ढा | ब | रा | ■ | ब | त | न |
| ण | ■ | त | न | ब | ■ | आ | ड | ■ | ह |
| ■ | ब | ज | न | ■ | न | व | सा | ग | र |
| खा | र | वी | ■ | स्वा | ग | त | ■ | हि | ■ |
| ■ | ता | ज | वा | ■ | र | ण | न | व | रा |
| मे | णा | ■ | ट | स | र | ■ | वा | र | स |
| ह | ■ | वा | णी | ■ | च | को | र | ■ | भ |
| न | ■ | ता | ■ | कि | ना | र | ■ | कं | ■ |
| त | ह | ■ | स | ल्ला | ■ | स | र | प | ण |

TATA

# टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

**नोंदणीकृत पत्ता :** ११वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०० ०१३
**शाखेचा पत्ता :** प्लॉट क्र. १८३, दुसरा मजला, माझदा टॉवर, युनिट ०३, जीपीओ रोड, त्रिंबक नाका, नाशिक-४२२ ००१

## अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या नियम ९(१)सह वाचण्यात येणाऱ्या नियम ८(६) अंतर्गत)

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या नियम ९(१)सह वाचण्यात येणाऱ्या नियम ८(६)सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत अचल मत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव सूचना.**

याद्वारे सर्वसामान्य जनतेस आणि कर्जदार/ सह-कर्जदार किंवा त्यांचे कायदेशीर वारस/ प्रतिनिधी (कर्जदार) यांना सूचित करण्यात येते की, **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. (टीसीएचएफएल)** यांच्याकडे तारण असलेल्या खाली नमूद अचल मालमत्तेचा टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. (टीसीएचएफएल)च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ताबा घेतलेला असून त्यांची खाली नमूद कर्जदार व सह-कर्जदारांकडून घेणे असलेल्या थकबाकीच्या वसुलीसाठी **दि. १८.०४.२०२४** रोजी ''जशी आहे जेथे आहे'' व ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथेच आहे'' तत्त्वावर विक्री करण्यात येईल. आरक्षित किंमत व बयाणा रक्कम खाली नमूद करण्यात आलेली आहे. याद्वारे सूचित करण्यात येते की, विक्री पुढे ढकलण्यात/ खंडित करण्यात न आल्यास सदर अनामत मत्ता/ मालमत्तेची **दि. १८.०४.२०२४ रोजी दु. ०२.०० वाजता ई-लिलावाद्वारे** विक्री करण्यात येईल. ई-लिलावात सहभागासाठी बयाणा रकमेचा डिमाण्ड ड्राफ्ट असलेला मोहोरबंद लिफाफा **१६.०४.२०२४ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत** शाखेच्या पत्त्यावर म्हणजे टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, प्लॉट क्र. १८३, दुसरा मजला, माझदा टॉवर, युनिट ०३, जीपीओ रोड, त्रिंबक नाका, नाशिक-४२२ ००१ येथे टीसीएचएफएलच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे पोचावयास हवा.

अनामत मत्ता/ अचल मालमत्तेची विक्री ''जशी आहे जेथे आहे'' तत्त्वावर करण्यात येईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जदार/ सह-कर्जदार/ कायदेशीर वारस/ कायदेशीर प्रतिनिधी/ जामीनदाराचे नाव | मागणी सूचनेनुसार रक्कम | आरक्षित किंमत | बयाणा रक्कम | ताब्याची स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | १००१४९१० | श्री. नितीन दिलीप अहिरे, श्रीमती वैशाली नितीन अहिरे | रु. १४,९५,९०८/- (रुपये चौदा लक्ष पंचाण्णव हजार नऊशे आठ फक्त) १४.०१.२०१९ | रु. १६,५०,०००/- (रुपये सोळा लक्ष पन्नास हजार फक्त) | रु. १,६५,०००/- (रुपये एक लक्ष पासष्ट हजार फक्त) | प्रत्यक्ष |
| | **अचल मालमत्तेचे वर्णन:** एनए सर्व्हे क्र. १७२, त्यापैकी प्लॉट क्र. ५४ ते ५६, त्यावरील सदनिका क्र. ०८, बिल्ट-अप क्षेत्रफळ सुमारे ५६.६७ चौ.मी., दुसरा मजला, विजया को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., नाशिक, ई टाइप, नाशिक, नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत. चतु:सीमा : **पूर्वेस-** बिल्डिंगची मोकळी जागा आणि ९ मी. कॉलनी रस्ता, **पश्चिमेस-** सदनिका क्र. ०९, **उत्तरेस-** सदनिका क्र. ११ आणि डक्ट, **दक्षिणेस-** बिल्डिंगची मोकळी जागा आणि प्लॉट क्र. ५३. | | | | | |
| २) | १००३००६७ | श्री. समाधान अंबादास धोंगडे, श्रीमती रेश्मा समाधान धोंगडे | रु. १२,४७,७४१/- (रुपये बारा लक्ष सत्तेचाळीस हजार सातशे एक्केचाळीस फक्त) १३.०७.२०२२ | रु. १४,३१,०००/- (रुपये चौदा लक्ष एकतीस हजार फक्त) | रु. १,४३,१००/- (रुपये एक लक्ष त्रेचाळीस हजार शंभर फक्त) | प्रत्यक्ष |
| | **अचल मालमत्तेचे वर्णन:** सर्व्हे क्र. ७६१, त्यापैकी प्लॉट क्र. ३३ व ३४, त्यावरील सदनिका क्र. ०४, क्षेत्रफळ सुमारे ४९.२५६ चौ.मी., दुसरा मजला, साईज्योत अपार्टमेन्ट, देवळाली, नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत, नाशिक. चतु:सीमा : **पूर्वेस-** जिना आणि साइड मार्जिन, **पश्चिमेस-** साइड स्पेस आणि ७.५ मी.चा कॉलनी रस्ता, **उत्तरेस-** साइड मार्जिन आणि प्लॉट क्र. ३५, **दक्षिणेस-** सदनिका क्र. ०३. | | | | | |
| ३) | ९४५५९१५ | श्री. वसंत विश्राम पगारे, श्रीमती तुळसाबाई वसंत पगारे | रु. ९,६२,६७३/- (रुपये नऊ लक्ष बासष्ट हजार सहाशे त्र्याहत्तर फक्त) १२.०२.२०२० | रु. १४,३०,०००/- (रुपये चौदा लक्ष तीस हजार फक्त) | रु. १,४३,१००/- (रुपये एक लक्ष त्रेचाळीस हजार शंभर फक्त) | प्रत्यक्ष |
| | **अचल मालमत्तेचे वर्णन:** सर्व्हे क्र. २३९/२/ए+बी+सी-१-१-१+२/ए/बी+सी/४, त्यापैकी प्लॉट क्र. ०४, त्यावरील सदनिका क्र. १३, क्षेत्रफळ सुमारे ५८.५५ चौ.मी., दुसरा मजला, प्रीती पार्क को-ऑप हा. सोसायटी लि., नाशिक, म्हसरूळ, नाशिकच्या हद्दीत. चतु:सीमा : **पूर्वेस-** मोकळी जागा, **पश्चिमेस-** सदनिका क्र. १४, **उत्तरेस-** सदनिका क्र. १२, **दक्षिणेस-** कॉलनी रस्ता. | | | | | |

लिलावाच्या वेळी सर्व लोकांना सामान्यपणे व्यक्तिशः बोली सादर करण्याचे आवाहन करण्यात येते. याद्वारे कर्जदार/ सह-कर्जदारांना पुढील सदर सूचनेच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत व्याजासह एकूण थकबाकीचा भरणा करण्याची शेवटची संधी देण्यात येत असून तसे न केल्यास अचल मालमत्तेची वेळापत्रकानुसार विक्री करण्यात येईल. लिलावाच्या दिनांकाअगोदर वर नमूद थकबाकी रकमेचा व्याज व शुल्कांसह (विक्रीच्या खर्चासह) प्राधिकृत अधिकाऱ्याकडे भरणा करण्यात आल्यास किंवा सुरक्षित कर्ज, व्याज व शुल्काचा भरणा केल्याबाबतचा त्यांचे समाधान होईल असा पुरावा देण्यात आल्यास ई-लिलाव थांबविण्यात येईल.

या विक्रीसंदर्भात कोणतेही कर्तव्य बजाविणाऱ्या अधिकाऱ्यास किंवा अशा इतर कोणत्याही व्यक्तीस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेसाठी बोली देता किंवा काही हित साधता येणार नाही.

सदर विक्री ही सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ मध्ये विहित करण्यात आलेल्या तसेच पुढील अटींच्या अधीन राहून करण्यात येईल :

**सूचना : मालमत्तांचा ई-लिलाव हा दिनांक १८.०४.२०२४ रोजी दु. ०२.०० ते ०३.०० वाजेपर्यंत https://www.bankeauctions.in/ या पोर्टलच्या माध्यमातून घेण्यात येईल व यात प्रत्येकी १० मिनिटांचे मर्यादित कालविस्तार असतील.**

**अटी व शर्ती :** **(१)** खाली परिशिष्टात देण्यात आलेला तपशील निम्नस्वाक्षरीकारांकडे उपलब्ध माहितीच्या आधारे देण्यात आलेला असून या घोषणेत काही चूक असल्यास, चुकीचे विधान करण्यात आल्यास किंवा काही गाळण्यात आल्यास त्यासाठी निम्नस्वाक्षरीकार जबाबदार असणार नाहीत. बोलीची रक्कम अथवा बोलीदारासंदर्भात काहीही वाद निर्माण झाल्यास तो लॉट सुरक्षित धनकोच्या संमतीने पुन्हा विक्रीस काढण्यात येईल. **(२)** सदर मालमत्तेची आरक्षित किमतीपेक्षा कमी रकमेस विक्री करण्यात येणार नाही. **(३)** बोलीवृद्धी रक्कम **रु. १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त)** असेल. **(४)** सदर मालमत्तेच्या खरेदीसाठी प्रस्तुत करण्यात येणाऱ्या सर्व बोली डिमाण्ड ड्राफ्टच्या स्वरूपातील ''टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.'' यांच्या नावे काढण्यात आलेल्या आणि शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर देय असलेल्या बयाणा रकमेसह सादर कराव्यात. अयशस्वी बोलीदारांची बयाणा रक्कम लिलावानंतर परत करण्यात येईल. बयाणा रकमेचा एनईएफटी/ आरटीजीएस/ आयएमपीएसद्वारे भरणा करण्यासाठी कृपया प्राधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. **(५)** सर्वोच्च बोलीदार बोली देण्यास पात्र असल्यास आणि त्याने प्रस्तुत केलेली बोलीची रक्कम आरक्षित किमतीपेक्षा कमी नसल्यास त्यास लॉटचा खरेदीदार घोषित करण्यात येईल. सर्वोच्च बोलीदाराने प्रस्तुत केलेली बोली रक्कम अत्यंत कमी वाटत असल्यास ती बोली फेटाळण्याचा अधिकार ''प्राधिकृत अधिकाऱ्यास'' असेल. **(६)** नमूद केलेल्या कारणांसाठी विक्री बरखास्त करण्याचा/ खंडित करण्याचा अधिकार ''प्राधिकृत अधिकाऱ्यास'' असेल. **(७)** आधीच वेळ घेऊन **१०.०४.२०२४ रोजी स. ११.०० ते सायं. ०५.०० वाजेपर्यंत** मालमत्तेची पाहणी करता येईल. **(८)** यशस्वी बोलीदार घोषित करण्यात आलेल्या व्यक्तीस अशी घोषणा करण्यात आल्यानंतर लगेच बयाणा रक्कम धरून खरेदी किमतीच्या २५ टक्के रक्कम ''प्राधिकृत अधिकाऱ्या''कडे २४ तासांच्या आत जमा करावी लागेल आणि ही रक्कम जमा न केल्यास सदर मालमत्ता पुन्हा लिलावात/ खासगी तहाद्वारे पुन्हा विक्रीस काढण्यात येईल. **(९)** वर नमूद केल्याप्रमाणे सुरुवातीची रक्कम जमा करण्यात आल्यास खरेदी रकमेपैकी उर्वरित देय रक्कम खरेदीदारास मालमत्तेच्या विक्रीची निश्चिती होण्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत (विक्रीचा दिनांक सोडून) ''प्राधिकृत अधिकाऱ्या''कडे जमा करावी लागेल किंवा १५व्या दिवशी रविवार किंवा सुट्टीचा दिवस येत असल्यास त्यापुढील दिवशी जमा करावी लागेल. **(१०)** वर नमूद कालावधीत भरणा न केल्यास विक्रीची पुन्हा घोषणा करण्यात आल्यानंतर सदर मालमत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. तोवर भरलेली रक्कम टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेडद्वारे जप्त करण्यात येईल. अशी कसूर करणाऱ्या खरेदीदारास मालमत्तेवर किंवा पुढे त्या मालमत्तेची ज्या रकमेस विक्री करण्यात येईल तिच्या कोणत्याही भागावर कोणताही दावा सांगता येणार नाही. **(११)** मालमत्तेवरील टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांना ज्ञात असलेले बोजे : वरील मालमत्तेच्या वर्णनात नमूद केल्याप्रमाणे. मालमत्तेवरील दावे आणि तिचे स्वरूप व मूल्य यावर परिणाम करू शकणारा इतर तपशील : वर नमूद केल्याप्रमाणे. इच्छुक बोलीदारांनी मालमत्ता कर, वीज बिल इ.सह वैधानिक देणी इ.सारख्या मालमत्तेवरील बोज्यांसंदर्भात स्वतंत्रपणे चौकशी करावी. **(१२)** इतर कोणताही तपशील किंवा ई-लिलावाच्या ऑनलाइन प्रशिक्षणासाठी संभाव्य बोलीदार आमचे सेवा पुरवठादार **मे. फोरक्लोजर,** ब्लॉक क्र. ६०५ए, सहावा मजला, मैत्रीवनम कमर्शियल कॉम्प्लेक्स, आमिरपेठ, हैदराबाद-५०० ०३८ द्वारे त्यांचे समन्वयक **श्री. अरिजित कुमार दास, ८१४२०००७२५, ८१४२०००६६, ८१४२०००६२, ई-मेल: arijit@bankauctions.com आणि** ई-मेल : info@bankauctions.com किंवा मनीष बन्सल, ई-मेल आयडी : Manish.Bansal@tatacapital.com, प्राधिकृत अधिकारी मोबाईल क्र. : ८५८८९८३६९६ यांच्यामार्फत संपर्क साधू शकतात. कृपया आपले प्रश्न, शंका ९९९९०७८६६९ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावेत. **(१३)** सर्वोच्च घोषित करण्यात आलेल्या बोली रकमेवर सर्वोच्च बोलीदारास १% दराने टीडीएस द्यावा लागेल. हा भरणा सर्वोच्च बोलीदारास मालक/ कर्जदाराच्या पॅनमध्ये करावा लागेल आणि चलनची प्रत आमच्या कंपनीकडे सादर करावी लागेल. **(१४)** वरील तपशिलासाठी सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर दिलेली **http://surl.li/rvvzu** ही लिंक पाहावी. **(१५)** कृपया ही लिंकसुद्धा पाहावी : **https://www.tatacapital.com/property-disposal.html**.

**कृपया लक्षात घ्यावे** की, टीसीएचएफएलने या मालमत्तेच्या विक्री/ लिलावासाठी वर नमूद लिलाव भागीदाराशिवाय इतर कोणत्याही ब्रोकर/ एजन्टची नियुक्ती केलेली नाही. कृपया इच्छुकांनी यासंदर्भातील कोणत्याही चौकशीसाठी केवळ निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

**स्थान :** नाशिक
**दिनांक :** ३०.०३.२०२४

स्वा/-
प्राधिकृत अधिकारी
टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.